वाचले :- १. सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रंमाक जिगौस/०४/११४७/प्र.क्रं.१७२/२००४ /स्वासैक-१ दिनांक २६/०९/२००५

२. या कार्यालयाकडील आदेश क्रं.पसह/कावि/१२५६/२००७ दिनांक ११/१०/२००७

३. या कार्यालयाकडील आदेश क्रं.पसह/कावि/१८९४/२०१० दिनांक १/१०/२०१०

४. या कार्यालयाकडील सुधारीत आदेश क्रं.पसह/कावि/२२७५/२०११ दिनांक १५/१२/२०११

५. मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१४०२ दिनांक- २४/०८/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा
क्र.सशा/पसह/कावि/१७३२/२०१५
दि. ५/०९/२०१५

**विषय :- पुणे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समिती**

**सुधारीत आदेश**

उक्त नमुद आदेशान्वये पुणे जिल्हा स्वातंत्र्य सैनिक गौरव समिती गठीत करण्यात आलेली आहे. मा. पालकमंत्री यांचेकडून अशासकिय सदस्यांचे नियुक्तीचे शिफारस आदेश दिनांक २४/०८/२०१५ रोजी प्राप्त झाल्याने सदर समितीत अशासकिय सदस्य म्हणून खालील प्रमाणे नेमणूक करणेत येत आहे.

| अ.क्र. | समितीची रचना | पत्ता | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब बापुराव जांभुळकर, (जिल्हयातील नामवंत व जेष्ठ स्वातंत्र्य सैनिकांपैकी एक) | द्रोपदी निवास, प्लॉट नं.७१, राव कॉलनी, भंडारे हॉस्पिटल, तळेगाव दाभाडे, पुणे मो.नं. ९८२२७८३९२६ | अध्यक्ष |
| **अशासकिय सदस्य- स्वातंत्र्य सैनिक सदस्य** | | | |
| २. | श्री. अरविंद केशव वाकडे | श्रीकृष्ण शाहू कॉलनी, गल्ली नं.१, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२. मो.नं.९८८१०२६२३६. | सदस्य |
| ३. | श्री. विठ्ठल परशुराम महाजन | ५७६, केसरी ऑफिस समोर, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३० मो.नं.९५२७६१७३२३ | सदस्य |
| ४. | श्री. सुनिल महादेव अडसूळ | मु. पो. भांबवडे, (न्हावी) ता. भोर, जि. पुणे मो.नं.९९२२३१२३१९ | सदस्य |
| ५. | श्री. नाना विठ्ठल शिंदे | मु. पो. कासार आंबोली, शिंदेवाडी, ता. मुळशी, जि. पुणे. मो.नं.९८२३०३९५०२ | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | निवासी उपजिल्हाधिकारी, गृह शाखा, पुणे | जिल्हाधिकारी कार्यालय, गृह शाखा, पुणे | सदस्य-सचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

प्रत :-

१) निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे तथा सदस्य सचिव, (गृह शाखा)

२/- उपरोक्त समिती वरील आदेशान्वये गठीत करण्यात आलेली असल्याने सदर समितीची बैठक सत्वर बोलावून समितीचे कामकाज कार्यान्वित करण्यात यावे. तसेच सोबतच्या आदेशाच्या प्रति संबंधित सदस्यांना बजावून त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेणेत यावी.

२) स्वीय सहाय्यक, मा. पालकमंत्री, अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ३२.

२/- सदर समिती या आदेशान्वये गठीत केलीबाबत मा. मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांजकडेस सविनय सादर.

**जिल्हाधिकारी पुणे करीता**

स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्ती वेतन अर्ज पडताळणीसाठी स्थापन करावयाच्या जिल्हा व तालुका स्तरावरील जिल्हा गौरव समित्याच्या स्थापने बाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्र :-जिगौस-०४/११४७/प्र.क्र.१७२/२००४/स्वासैक-१
मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २६ सप्टेंबर,२००५.

पहा : शासन निर्णय,सा.प्र.वि.क्रमांक पीओएस-२००५/२/प्रक्र२/२००५/स्वासैक-१, दिनांक १.१.२००५.

**शासन निर्णय :-**

स्वातंत्र्य सैनिक सन्मान निवृत्तीवेतनाच्या मंजूरीचे अर्ज त्यासोबतच्या पुराव्यासह जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर झाल्यानंतर त्या अर्जावर शासनाकडे निश्चित स्वरुपाची अभिप्रायात्मक शिफारस करणे व स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रश्नांसंबधी तत्सम कामे करणे यासाठी संबंधित जिल्हयातील नामवंत व ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिकांपैकी एक अध्यक्ष व चार सदस्य अशा एकूण पाच स्वातंत्र्य सैनिकांच्या नेमणुका करुन जिल्हा स्तरावर जिल्हा गौरव समित्या गठित करण्यात येतात. आतापर्यंत या समित्यांचे गठन/पुनर्गठन करण्याचे प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविण्यात येत होते. शासन स्तरावर संबंधित मा.पालकमंत्री यांनी मा.संपर्क मंत्री यांच्या सहमतीने जिल्हास्तरीय समितीची रचना अंतिम केल्यानंतर समितीचे गठन/पुनर्गठन या बाबतचे आदेश शासन स्तरावरुन निर्गमित करण्याची कार्यपध्दती आतापर्यंत अवलंबिण्यात येत होती.

२. वरील नमूद कार्यपध्दतीचा अवलंब करताना लागणारा विलंब लक्षात घेऊन तसेच जिल्हा गौरव समित्या या वैधानिक समित्या नसल्यामुळे त्यांच्या गठन/पुनर्गठना संबंधीची कार्यपध्दती सुटसुटीत व्हावी व हे काम विनाविलंब होऊन समित्या शक्य तितक्या लवकर गठित होणे आवश्यक आहे, जेणेकरुन स्वातंत्र्य सैनिकांचे प्रश्न लवकरात लवकर जिल्हा स्तरावर सोडविण्यात यावेत. या उद्देशाने यापुढे सदर समित्यांचे गठन/पुनर्गठन यासंबंधाने आता पुढील प्रमाणे सुधारित कार्यपध्दती अवलंबून जिल्हा गौरव समित्या गठित करण्याची कार्यवाही करण्यात यावी :-

स्वातंत्र्य सैनिक अथवा ते हयात नसल्यास त्यांच्या पती/पत्नी यांना दयावयाचे स्वातंत्र्यसैनिक निवृत्तीवेतन व इतर सवलती या संदर्भातील शिफारशी करणे व अन्य तत्सम बाबी यासाठीच्या जिल्हा स्तरावरील जिल्हा गौरव समित्यांचे गठन/पुनर्गठन अथवा रिक्त जागा भरणे, इत्यादि संदर्भातील प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हयाचे मा.पालकमंत्री व मा.संपर्कमंत्री यांचे सहमतीने अंतिम करावेत व समितीच्या गठन/पुनर्गठनासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन निर्गमित करण्यात यावेत. याबाबतचे आदेश निर्गमीत केल्यानंतर सदर आदेशाची प्रत तात्काळ शासनाच्या सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात यावी.

३. स्वातंत्र्य सैनिक जिल्हा गौरव समितीवर जिल्हाधिकाऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून निवासी उप-जिल्हाधिकारी समितीचे "सदस्य सचिव" म्हणून समितीला मदत करण्यासाठी राहतील. जिल्हा गौरव समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासनाला अंतिम

शिफारस करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना राहील. जिल्हाधिकाऱ्यांनी गौरव समितीच्या बैठकीमध्ये वेळोवेळी उपस्थित राहून स्वातंत्र्य सैनिकांचे प्रश्न सोडविण्यास मदत करावी. राज्य स्तरीय स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे संबंधित महसूल विभागात राहणारे सदस्य हे त्या महसूल विभागातील सर्व जिल्हा गौरव समित्याचे पदसिध्द सभासद राहतील. त्याप्रमाणे त्यांना संबंधित जिल्हा गौरव समित्याच्या बैठकांना आमंत्रित करण्यात यावे.

४. शासन असेही आदेश देत आहे की, जिल्हा गौरव समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे राहील:-

अ) जिल्हयातून जे अर्ज स्वातंत्र्य सैनिक म्हणून निवृत्तीवेतन मिळण्यासाठी प्राप्त होतात, त्यावर प्रचलित शासकीय नियमाप्रमाणे अभिप्राय/शिफारशी देणे.

ब) जे स्वातंत्र्य सैनिक किंवा त्यांचे वारस, निवृत्तीवेतनाव्यतिरिक्त त्यांना प्रचलित शासकीय आदेशानुसार देय असलेल्या अन्य सवलतींसाठी अर्ज करतात, त्या अर्जांचे निकाल त्वरीत होण्यासाठी मदत करणे.

क) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना नोकरीमध्ये प्रचलित शासन आदेशानुसार नोकरी मिळेल,या दृष्टीने योग्य ती कार्यवाही आणि प्रयत्न करणे.

ड) स्वातंत्र्य सैनिकांचे मेळावे घेणे.

इ) स्वातंत्र्य सैनिकांना मदत, मार्गदर्शन तसेच त्यांच्या अडचणी सोडविण्याचे दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करणे.

५. जिल्हा गौरव समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा आयोजित करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(द.अ.शिंदे)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

मा.राज्यपालाचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उप मुख्यमंत्री यांचे सचिव
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
प्रधान सचिव व वि.चौ.अ (२), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,
महालेखापाल,महाराष्ट्र राज्य-१,मुंबई,
महालेखापाल,महाराष्ट्र राज्य-२,नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई
सर्व निवासी लेखा परिक्षा अधिकारी,
संचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय (योग्य ते प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी)
स्वातंत्र्य सैनिक कक्ष -२ व ३,
निवड नस्ती.